लोकसत्ता पा. नं. १.

# मांसविक्रीवर बंदीमुळे भाईंदरमध्ये संताप

## नागरिकांना माहिती न दिल्याची महापालिकेची कबुली

**लोकसत्ता वार्ताहर**

**भाईंदर :** महावीर जयंतीनिमित्त रविवारी चिकन-मटण विक्रीची दुकाने बंद ठेवण्याच्या महापालिकेच्या निर्णयामुळे नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला. मिरा-भाईंदर महापालिकेने नागरिकांना अंधारात ठेवून ही बंदी लागू केल्याने रविवारी बाजारात गेलेल्या नागरिकांचा बंद दुकाने पाहून हिरमोड झाला.

महावीर जयंतीनिमित्त रविवारी मिरा-भाईंदर शहरातील मांस विक्रीची दुकाने बंद ठेवण्याचा निर्णय महापालिकेने घेतला. मात्र याबाबत नागरिकांना कोणतीही माहिती देण्यात आली नव्हती. नागरिकांना अंधारात ठेवून केवळ मांस विक्रेत्यांना याबाबच्या सूचना देण्यात आल्या होत्या. परिणामी रविवारी बाजारात चिकन-मटण खरेदीसाठी गेलेल्या नागरिकांच्या पदरी निराशा पडली. ''आठवड्यातील एक दिवस आम्हाला सुट्टी असते. त्यामुळे या दिवशी आमच्या घरी मांसाहारी जेवण बनते. मात्र आज मटण घेण्यासाठी घराबाहेर पडलो असताना ते कुठेच मिळाले नाही,'' असे चाणक्य आजगावकर या नागरिकाने सांगितले.

मागील काही वर्षांत येथे एका विशिष्ट समाजाच्या रहिवाशांमुळे मांसबंदीसारखे निर्णय घेतले जात आहेत. मात्र हा *(पान ११ वर)*



### यापूर्वीही वाद

शहरात जैन समाजाची वाढती संख्या पाहता यापूर्वीदेखील मांस विक्रीवरून अनेक संघर्ष उभे राहिले आहेत. पर्युषण काळात नेहमी वाद निर्माण होत असतो. यामुळे महापालिका सभागृहात आंदोलने करून मांस खाल्ल्याचा इतिहास आहे. मात्र प्रशासन एका विशिष्ट समाजाच्या दबावाला बळी पडून नेहमी मांसाहारबंदीचा निर्णय घेत असल्याचा आरोप करण्यात येत आहे.

**वसईत मांसविक्री बंदी निर्णयाचा फज्जा / पान ३**

# मिरा-भाईंदरमध्ये भीषण पाणीटंचाई

**भाईंदर :** मागील दोन दिवसांपासून मिरा-भाईंदर शहरातील पाणीपुरवठा बंद असल्याने भीषण पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. त्यात खासगी टँकरचे पाणीदेखील मिळत नसल्याने नागरिकांचे हाल होत आहेत. अधिकचे पाणी पैसे खर्च करून बाटलीबंद पाण्यावर नागरिकांना आपली तहान भागवत आहेत. यावर्षी उकाडा वाढण्यानंतर पाण्याची मागणी वाढली आहे. त्यामुळे शहराला होणाऱ्या पाणीपुरवठा अनियमित होऊ लागला आहे. त्यातच जलवाहिनी फुटणे अथवा शटडाऊनमुळे पाणीपुरवठा बंद होत असल्याचे कारण वारंवार प्रशासनाकडून दिले जात आहे.

**– सविस्तर वृत्त २**

लोकसत्ता पा. नं. ३.

# तरुणाची आत्महत्या; पोलिसाने धमकी दिल्याचा आरोप

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** विरारमध्ये राहणाऱ्या एका तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. आत्महत्येपूर्वी त्याने एक चित्रफीत तयार केली होती. पत्नीकडून होणारा त्रास आणि पोलिसाने दिलेल्या धमकीमुळे आत्महत्या करत असल्याचे त्यात म्हटले होते. या प्रकरणी विरार पोलिसांनी तरुणाच्या पत्नीवर आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे, तर आरोप असलेल्या पोलिसाची विभागीय चौकशी करण्यात येणार आहे.

विरार पूर्वेच्या मनवेलपाडा येथे अभय पालशेतकर (२८) हा पत्नीसोबत (२५) राहत होता. ११ महिन्यांपूर्वी त्यांचे लग्न झाले होते. त्यांच्यात कौटुंबिक वाद होते. शनिवारी पत्नीने पोलिसांत तक्रार दिल्यानंतर पोलिसांनी अभयला बोलावून १४९ अंतर्गत नोटीस देऊन समज दिली होती. घरी आल्यावर अभयने घरातील हॉलच्या छताला साडीच्या साहाय्याने गळफास लावून आत्महत्या केली. आत्महत्येपूर्वी त्याने एक चित्रफीत तयार करून नातेवाईकांना पाठवली. पत्नीने खोटी तक्रार दिली तर सुनील पवार नामक पोलिसाने टायरमध्ये घालून मारण्याची धमकी दिल्याने मी आत्महत्या करत असल्याचे या चित्रफितीत त्याने सांगितले. यामुळे शनिवारी रात्री अभयच्या नातेवाईकांनी पोलिसांवर कारवाई करावी, या मागणीसाठी गोंधळ घातला होता.

### पत्नीवर गुन्हा, पोलिसाची विभागीय चौकशी

या प्रकरणी आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी अभयच्या पत्नीवर विरार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. पोलिसाने धमकी दिल्याचा आरोप चित्रफितीमध्ये केला आहे. त्याची विभागीय चौकशी करून पुढील कारवाई केली जाईल, असे पोलीस उपायुक्त जयंत बजबळे यांनी सांगितले.

# वसईत मांसाहार बंदी निर्णयाचा फज्जा

**लोकसत्ता, विशेष प्रतिनिधी**

**वसई :** महावीर जयंतीनिमित्त रविवारी चिकन-मटण विक्रीची दुकाने बंद ठेवण्याच्या पालिकेच्या निर्णयाचा फज्जा उडाला. बंदी झुगारून दुकाने सुरू होती आणि नागरिकांनीदेखील नेहमीप्रमाणे खरेदीसाठी गर्दी केली होती.

महावीर जयंतीनिमित्त रविवार २१ एप्रिल रोजी शहरातील चिकन मटण विक्रीची दुकाने बंद ठेवण्याचे आदेश वसई विरार महापालिकेने गुरुवारी काढले होते. त्याचे तीव्र पडसाद उमटले होते. विविध सामाजिक संघटनांनी या बंदीला विरोध केला होता तर खाटीक संघटनांनी बंदी न जुमानता दुकाने सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला होता.

'आम्ही पोलीस उपायुक्तांना या निर्णयाची माहिती देऊन कारवाईचे निर्देश दिले होते, अशी माहिती पालिकेचे प्रभारी साहाय्यक आयुक्त (आरोग्य) सुखदेव दरवेशी यांनी दिली.

पुढारी पा. नं. ५.

# विरारच्या तरुणाने व्हीडिओ बनवत संपवले जीवन; कुटुंबियांचे पोलिसावर गंभीर आरोप

**नालासोपारा : पुढारी वृत्तसेवा**

विरारमध्ये राहणाऱ्या एका तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. आत्महत्येपूर्वी त्याने एक चित्रफित तयार केली होती. पत्नीकडून होणारा त्रास आणि पोलिसाने दिलेल्या धमकीमुळे आत्महत्या करत असल्याचे त्यात म्हटले होते. यामुळे संतप्त नातेवाईकांनी पोलिसांवर कारवाईची मागणी केली आहे. या प्रकरणी विरार पोलिसांनी मयत तरुणाच्या पत्नीवर आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे तर आरोप असलेल्या पोलिसाची विभागीय चौकशी करण्यात येणार आहे.

विरार पुर्वे कडील मनवेलपाडा येथे अभय पालशेतकर (२८) हा पत्नी आरोही पालशेतकर (२५) हिच्यासोबत रहात होता. ११ महिन्यांपूर्वी त्या दोघांचे लग्न झाले होते. त्यांच्यात कौटुंबिक वाद होते. शनिवारी पत्नीने पोलिसात तक्रार दिल्यानंतर पोलिसांना अभयला बोलावून १४९ अंतर्गत नोटीस देऊन समज दिली होती. नंतर घरी आल्यावर अभयने घरातील हॉलच्या छताला साडीच्या सहाय्याने गळफास लावून आत्महत्या केली. आत्महत्येपूर्वी त्याने एक चित्रफित तयार केली होती. पत्नीने खोटी तक्रार दिली तर सुनिल पवार नामक पोलिसाने कोंबडा बनवीन, टायर मध्ये घालून मारण्याची धमकी दिल्याने मी आत्महत्या करत असल्याचे या चित्रफितीत त्याने सांगितले. ही चित्रफित सर्व नातेवाईकांना पाठवली होती. यामुळे शनिवारी रात्री अभयच्या नातेवाईकांनी पोलीस ठाण्यात कारवाइची मागणी केली होती. माझ्या मुलाला पोलिसांनी मारलं, धमकी दिली. बळजबरीने सही करायला लावली. टायरमध्ये टाकून कोंबडाकरून मारेन, कसा जामीन मिळतो ते बघतो, अशी धमकी दिली त्यामुळे माझ्या मुलाने आत्महत्या केली असा आरोप मयत अभय पालशेतकर याची आई उज्वला पालशेतकर यांनी केला आहे. ज्या पोलिसाकडे तक्रार होती तो काही बोलत नव्हता. मात्र शेजारी असलेला सुनिल पवार याने माझ्या भावाला धमकी दिल्यामुळे तो घाबरला आणि त्याने आत्महत्या केली, असे मयत अभयचा भाऊ निर्भय याने सांगितले. आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी मयत अभयच्या पत्नीवर विरार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. कौटुंबिक वादातून हा प्रकार घडल्याचे पोलीस उपायुक्त (परिमंडळ ३) जयंत बजबळे यांनी सांगितले.

पुढारी पु. पा. ७

# मुंबई-अहमदाबाद महामार्गाच्या व्हाईट टॅपिंगचे काम नियोजनशून्य



**तलासरी : पुढारी वृत्तसेवा**

मुंबई-अहमदाबाद महामार्गावर आच्छाडपासून दहिसर चेक नाक्यापर्यंतचा १२१ किलोमीटर लांबीच्या महामार्गावर व्हाईट टॅपिंगच्या कामात कॉंक्रीटचा थर टाकण्याचे काम सुरू आहे.

मुंबई - अहमदाबाद महामार्गावरील व्हाईट टॅपिंगच्या नियोजनशून्य कामामुळे वाहतूक कोंडीसह अपघातांच्या संख्येत वाढ झाली आहे. दापचरी सीमा तपासणी नाक्यावर कॉंक्रिटीकरणाच्या कामामुळे अपघातांसह रोजच वाहतूक कोंडी होत आहे. दररोजच्या कोंडीमुळे महामार्गावरील चालक आणि प्रवासी झाले हैराण झाले आहेत. व्हाईट टॅपिंगचे काम करणाऱ्या कंत्राटदारावर महामार्ग प्राधिकरणाचे नियंत्रण नसल्याने कोंडीत भर पडत असून कामाच्या ठिकाणी सुरक्षेच्या उपयोजना केल्या जात नसल्याने अपघातांना निमंत्रण दिले जात आहे.

तलासरी पोलीस ठाणे हद्दीत व्हाईट टॅपिंगचे काम सुरू झाल्यापासून आजपर्यंत लहान मोठे १८ अपघात झाले असून त्यामध्ये १४ प्रवासी नागरिकांचा मृत्यू झाला असून ११ प्रवासी नागरिक गंभीर जखमी झाले आहेत. त्यामध्ये मार्चच्या एका महिन्यात सर्वाधिक १० आपघत झाले असून १० निष्पाप लोकांचा बळी गेला आहे.

महामार्गावर व्हाईट टॅपिंगचे काम करणाऱ्या कंत्राटदार कंपनीच्या वाहतुकीचे नियोजन न करता कामाला सुरुवात केली होती. कामाच्या सुरुवातीच्या दिवसात कोंडीमुळे महामार्गावरील वाहतूक कोलमडून पडली होती. काही किमी अंतर पार करण्यासाठी आठ ते दहा तासांचा वेळ लागत होता. दरम्यान वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी विरुद्ध दिशेने वाहतूक सुरू करण्यात आली आहे. विरुद्ध दिशेच्या वाहतुकीमुळे अपघात होत आहेत. काम सुरू असलेल्या ठिकाणी सुरक्षेच्या उपाययोजना, दिशादर्शक फलक व पर्यायी वाहतूक व्यवस्थेसाठी ट्राफिक गार्ड नेमण्यात आले नाहीत. महामार्गावरून गावांकडे वळण्यासाठी सोय नसल्याने वाहनचालकांसह प्रवाशांची गैरसोय होत आहे.

सकाळ पा. नं. ५.

# दीड हजार किलो संशयित मांस जप्त

भाईंदर, ता. २१ (बातमीदार) : काशी-मिरा येथे पोलिसांनी एका टेम्पोतून दीड हजार किलो संशयित गोमांस जप्त केले आहे. चालक टेम्पो तेथेच सोडून पळून गेला.

शनिवारी मध्यरात्रीनंतर एक वाजता काशी-मिरा येथील नीलकमल नाक्याजवळ गोमांसाची वाहतूक सुरू असल्याच्या संशयावरून बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी एक टेम्पो अडवला. त्यात सुमारे दीड हजार किलो मांस सापडल्याने याबाबत काशी गाव पोलिस ठाण्यात माहिती देण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत टेम्पो ताब्यात घेतला. हे मांस मिरा रोड येथे नेले जात होते, अशी माहिती सहायक पोलिस निरीक्षक विजय साठे यांनी दिली. दरम्यान, जप्त केलेल्या मांसाचे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवण्यात आले आहेत, अशी माहिती मिरा-भाईंदर महापालिकेचे पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. विक्रम निराटले यांनी दिली.

लोकमत पु. ५१. १.

# जुन्या इमारतीच्या गॅलरीचा भाग कोसळला;एक जखमी

## इमारत महापालिकेने केली जमीनदोस्त



नाळे गावातील एका ५० वर्षे जुन्या इमारतीच्या गॅलरीचा काही भाग शनिवारी रात्रीच्या सुमारास कोसळला.

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : नाळे गावातील एका ५० वर्षे जुन्या इमारतीच्या गॅलरीचा काही भाग शनिवारी रात्रीच्या सुमारास कोसळला. या इमारतीतील एक जण जखमी झाला आहे. अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी जाऊन तेथील पाहणी केली. तर, रविवारी सकाळी मनपाने ही अतिधोकादायक इमारत जमीनदोस्त केली आहे.

नाळे रोडवरील खंबाळेश्वर येथील चौधरी वाडी ही ५० वर्षे जुनी इमारत होती. या इमारतीच्या गॅलरीचा काही भाग शनिवारी रात्री साडे नऊ वाजण्याच्या सुमारास कोसळला.

### इमारत अतिधोकादायक

१ या इमारतीत एक जण राहत असल्याची माहिती अग्निशमन दलाने दिली आहे. राहुल मदन सिंग (२८) हा तरुण जखमी झाला असून, त्यालाही अग्निशमन दलाने रेस्क्यू केले आहे.

२ ही इमारत अतिधोकादायक असल्याने सी १ मध्ये नोंद करण्यात आल्याचे उपायुक्त अजित मुठे यांनी 'लोकमत'ला सांगितले.

३ मनपाच्या ई प्रभागाच्या सहायक आयुक्त नीता कोरे, कनिष्ठ अभियंता व इतर मनपा कर्मचारी यांनी रविवारी सकाळी जेसीबीच्या सहाय्याने ही अतिधोकादायक इमारत जमीनदोस्त केली.

# फायबरच्या कंपनीला आग, लाखोंचे नुकसान



विरार पूर्वेकडील विधी ज्वेल कंपनीला शनिवार २० एप्रिल रोजी रात्री ११ वाजता आग लागली. आगीत कंपनीचे लाखोंचे नुकसान झाले आहे.

लोकमत न्यूज नेटवर्क

विरार : विरार पूर्वेकडील वीर सावरकर मार्ग येथील गणपती मंदिराच्या समोरील विधी ज्वेल कंपनीला शनिवार २० एप्रिल रोजी रात्री ११ वाजताच्या सुमारास आग लागली. आग जास्त भडकल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र पालिकेच्या अग्निशमन विभागाच्या जवानांनी वेळेवर पोहोचून आगीवर नियंत्रण मिळवले. यात जीवितहानी झालेली नसली तरी कंपनीचे लाखो रुपयांचे नुकसान झाले.

इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावर कंपनी असून दुसऱ्या मजल्यावर मुलांचे रुग्णालय लवकरच सुरू होणार असून त्याचे काम सुरू आहे. कंपनीचे अग्नी लेखापरीक्षण झाले नसल्याचे समोर आले आहे. मात्र आग लागण्याचे कारण स्पष्ट झालेले नाही. कंपनीमध्ये देवीदेवता, महापुरुषांच्या फायबरपासून बनलेल्या मूर्ती पॅकिंग करण्याचे काम केले जाते.

### पुठ्ठ्याचे प्रमाण जास्त असल्याने भडकली आग

- वसई, विरार, नालासोपारा, नायगाव येथून मूर्ती मागवून बाहेरील देशात पाठवले जाते. आगीमुळे मूर्ती काळ्या पडल्या असून त्यामध्ये चार ते पाच लाखांचे नुकसान झाले आहे.
- कंपनीमध्ये पुठ्ठ्याचे प्रमाण जास्त होते, यामुळे आगीचा भडका मोठा होता, अशी माहिती कंपनीचे मालक बजरंग गुप्ता यांनी 'लोकमत'ला दिली.

### अनेक कंपन्यांचे लेखापरीक्षण झाले नाही

- वसई विरार शहरातील बहुतांश कंपन्यांनी आपल्या कंपन्यांचे अग्नी लेखापरीक्षण करून घेतले नसल्याची माहिती मागील महिन्यात उघड झाली होती.
- यावर पालिकेने कोणतीच ठोस भूमिका बजावली नसल्यामुळे शहरात आगी लागण्याचे प्रमाण वाढले आहे, असा आरोप सामाजिक कार्यकर्ते यांच्याकडून केला जात आहे.

पुण्यनगरी पृ. ५ ता-१.

# विरारमध्ये आग, जीवितहानी टळली

## आगीवर मिळवले नियंत्रण, कंपन्यांचे नुकसान

**नालासोपारा :** विरारच्या नारंगी गणपती मंदिर जवळ महावीर इंडस्ट्रीजच्या एका औषध बनवण्याच्या कंपनीला शनिवारी रात्री भीषण आग लागली. आगीत मोठी वित्तहानी झाली. मात्र सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.



विरारच्या भररस्त्यावर असणाऱ्या या इमारतीत टाइम लॅबोरेटरी ही औषधे बनवण्याची कंपनी होती. त्याच इमारतीत एक हॉस्पिटल सुद्धा होते. मात्र सध्या ते बंद असल्याने जीवितहानी टळली. इमारतीत औषध बनवण्याची कंपनी व मूर्ती बनवण्याची कंपनी एकाच मजल्यावर होत्या. रात्री १०.३० च्या सुमारास अचानक आग लागली. आग भीषण होती, मात्र वसई विरार महापालिकेच्या अग्निशमन दलाचे जवान तत्काळ घटनास्थळी दाखल झाल्याने कोणताही अनर्थ झाला नाही. कंपनीत असणारे मोठे ४ सिलिंडर बाहेर काढण्यात आले. इमारतीच्या पायऱ्या निमुळत्या असल्यामुळे आग विझवताना जवानांना अडथळे येत होते. तरीसुद्धा अग्निशमन दलाच्या जवानांनी आगीवर नियंत्रण मिळवले. आगीत दोन्ही कंपन्यांचे नुकसान झाले आहे.

# पोलिसाला बोलण्यात गुंतवून केली चोरी

**मीरा रोड :** भाईंदर पूर्वेच्या बंदरवाडी जवळील लक्ष्मी टॉवर, नवघर रोड येथे १७ एप्रिल रोजी एका सेवानिवृत्त पोलिसाचे एटीएमकार्ड चोरून त्यातून ५० हजार काढले होते. याप्रकरणी नवघर पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भाईंदर पूर्व नवघर रोड भालचंद्र कॉम्प्लेक्स येथे राहणारे अनिल जाधव (५९) हे १७ एप्रिल रोजी सायंकाळी ५ च्या सुमारास बाहेर फिरण्यासाठी घरातून बाहेर निघाले. त्यावेळी ते एचडीएफसी बँकच्या एटीएममध्ये मिनी स्टेटमेंट काढण्यासाठी गेले. त्यांचे कार्ड मशिनमध्ये अडकले. त्यांनी ते काढण्याचा प्रयत्न केला. त्याचवेळी एक व्यक्ती एटीएम मशिन जवळ आला. त्यांनी जाधव यांना एटीएम कार्डचे पिन नंबर व कॅन्सल बटन दाबण्यास सांगितले. त्याच्या सांगण्यावरून त्यांनी पिन नंबर व कॅन्सल बटन दाबले, परंतु कार्ड निघाले नाही. नंतर त्यांनी त्यांचे एटीएम कार्ड ब्लॉक करण्यासाठी त्यांच्या मित्रांना फोन करत एटीएमच्या बाहेर आले. एका व्यक्तीने सेवानिवृत्त पोलीस कर्मचारी अनिल जाधव यांचे एटीएम कार्ड चोरले व वेगवेगळ्या एटीएममधून ५० हजार रुपये काढले.

लोकमत पु-५ ता-१.

# सुरळीत वाहतूक-रहदारीसाठी उपाययोजना न केल्यास कारवाई


## पोलिसांचा ठेकेदारांना इशारा : मीरा-भाईंदरमध्ये रस्ते खोदाईमुळे कोंडी

धीरज परब

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** शासन आणि मीरा-भाईंदर महापालिकेच्या माध्यमातून शहरात सिमेंट रस्त्याची बांधकामे, सूर्या पाणीपुरवठा योजनेची कामे आदींसाठी मोठ्या प्रमाणात रस्ते खोदून ठेवण्यात आले आहेत. या खोदकामामुळे शहरात अनेकदा वाहतूक कोंडी होऊन रहदारीला अडथळा होतो. सुरळीत वाहतूकीसह रहदारीसाठी ठेकेदार आणि संबंधितांनी योग्य त्या उपाययोजना वेळीच कराव्यात, अन्यथा कायदेशीर कारवाईचा बडगा उचलला जाईल, असा इशारा वाहतूक पोलिसांनी ठेकेदार व प्रतिनिधींना दिला आहे.

शहरातील रस्त्यांच्या खोदकामामुळे होत असलेल्या वाहतूक कोंडी आणि जवळ आलेला पावसाळा पाहता, मीरा-भाईंदर, वसई-विरार उपायुक्त मुख्यालय सुहास बावचे यांनी आढावा बैठक बोलावली होती. या बैठकीला वाहतूक शाखेचे सहायक पोलिस आयुक्त विलास सानप, पोलिस निरीक्षक देविदास हंडोरे यांच्यासह रस्ता बांधकाम करणारे ठेकेदार व प्रतिनिधी आदी उपस्थित होते.



शहरात सिमेंट रस्त्याची बांधकामे, सूर्या पाणीपुरवठा योजनेची कामे आदींसाठी मोठ्या प्रमाणात रस्ते खोदून ठेवण्यात आले आहेत.

### कामासंबंधी पोलिसांनी केलेल्या सूचना

- रस्ते खोदकामची कामे ही पावसाळ्याआधी वेळेत पूर्ण करा. उर्वरित काम हे पावसाळा संपल्यानंतरच सुरु करा. ज्याठिकाणी कामे चालू आहेत.
- त्याठिकाणी वाहतूक सुरळीत राहण्यासाठी व नागरिकांना रहदारीला अडथळा येऊ नये म्हणून ट्रॅफिक वॉर्डन ठेवा.
- कामाच्या ठिकाणी बॅरिकेटिंग करा. रेडियम पट्टी, नाइट ब्लिंकर्स, वाहतूक कोन यांचा वापर करा जेणेकरून रात्रीच्या वेळी दुर्घटना होणार नाही, आदी सूचना उपायुक्त सुहास बावचे यांनी केल्या आहेत.
- रहदारी व वाहतुकीला अडथळा होऊ न, दुर्घटना घडू नये म्हणून आवश्यक उपाययोजना न केल्यास कायदेशीर कारवाईचा इशाराही पोलिसांनी दिला आहे.

### काँक्रीटीकरण, पाणी योजनेसाठी खोदकाम

**१** राज्य शासनाच्या तसेच महापालिकेच्या मंजूर निधीमधून शहरातील अनेक लहान-मोठ्या रस्त्यांचे काँक्रीटीकरणाचे काम सध्या हाती घेण्यात आले आहे. त्याचबरोबर सूर्या पाणीपुरवठा योजनेंतर्गत शहरात नवीन मोठ्या जलवाहिन्या टाकण्याचे काम जोरात सुरु आहे. त्यासाठीसुद्धा रस्ते ठिकठिकाणी खोदून ठेवले आहेत.

**२** रस्ते मोठ्या प्रमाणात खोदून कामे करताना रहदारी आणि वाहतुकीला अडथळा होऊ नये तसेच सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक त्या उपाययोजना महापालिका व ठेकेदार यांच्याकडून प्रभावीपणे केल्या गेलेल्या नाहीत.

**३** खोदकाम सुरु आहे, तेथे रहदारी व वाहतुकीचे नियमन करण्यासाठी वॉर्डन नेमलेले नाहीत. खोदकामाच्या ठिकाणी सुरक्षेच्या उपाययोजना न केल्याने अनेक छोटे-मोठे अपघात होत आहेत. शिवाय तोंडावर पावसाळा आला असून, खोदकाम व इतर संबंधित कामे त्या आधी पूर्ण करणे आवश्यक आहे.

# पतीने केली पत्नीची २० लाखांची फसवणूक

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** गाळानगरच्या पूजा बिल्डिंगमध्ये राहणाऱ्या लैली ऊर्फ सुमन खान (३५) यांची २८ नोव्हेंबर ते १८ डिसेंबरदरम्यान तिचा पती आणि अन्य एका व्यक्तीने मिळून लाखोंची फसवणूक केली आहे.

सुमन खान यांना त्यांचे पती आरोपी मिठारुल खान याने वेळोवेळी पैशाची मागणी करत पैसे दिले नाही म्हणून मारहाण केली होती तसेच त्यांचा मोबाईल काढून घेतला होता. त्यानंतर त्या पुणे येथे त्यांच्या बहिणीकडे रागाने निघून गेल्या.

### दोघांवर गुन्हा दाखल

- त्यांच्या पतीला त्यांनी गुगल पे व फोन पेचा पासवर्ड विश्वासाने दिला. पतीने जिवदानी मोबाइल सेंटरचे मालक यांच्या मदतीने सुमन यांना काही न सांगता अकाउंटमधून १९ लाख ८३ हजार ८७८ रुपये काढून घेऊन अपहार केला आहे.
- हे पैसे त्यांनी परत मागितले असता आरोपी पतीने त्यांना जिवे ठार मारण्याची धमकी दिली आहे. आचोळे पोलिसांनी याप्रकरणी गुरुवारी गुन्हा दाखल केला आहे.

CS CamScanner

लोकमत पु.५ता.१.

## तरुणावर शस्त्राने वार



**नालासोपारा :** हनुमान नगरच्या न्यू स्टार सोसायटीत राहणाऱ्या सय्यद फहाद (२२) या तरुणावर दोघांनी शुक्रवारी मध्यरात्री धारदार शस्त्राने वार केल्याची घटना घडली आहे. जाफर व इम्रान सय्यद या दोघांनी त्यांच्या घरी येऊन तू आजोबांना सतत शिवीगाळ व मारहाण करत असल्याने त्यांचा मृत्यू झाल्याचे बोलून शिवीगाळ करून चेहऱ्यावर वार केला. त्यानंतर उजव्या हातावर, डाव्या कानाखाली वार करून गंभीर जखमी केले. नालासोपारा पोलिसांनी शनिवारी गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी पोलिस अधिक तपास करीत आहेत.

## नऊ लाखांचे मेफेड्रोन पकडले

**नालासोपारा :** फन फियस्टा मल्टिप्लेक्स बाजूकडून पाटणकर पार्क सिग्नलकडे जाणाऱ्या रोडवर दुचाकीवरून जाणाऱ्या आरोपीकडे शुक्रवारी संध्याकाळी नालासोपारा पोलिसांनी लाखो रुपयांचा मेफेड्रोन हा अमली पदार्थ जप्त केला आहे. आरोपी मलिक हुसेन (३४) याने स्वतःजवळ ८ लाख ८० हजार रुपये किमतीचे मेफेड्रोन विक्रीसाठी बाळगलेले आढळले. नालासोपारा पोलिसांनी शनिवारी गुन्हा दाखल केला आहे.

## पत्नीशी भांडण; पतीचा गळफास



**नालासोपारा :** नागिनदास पाड्यातील यादव चाळ येथे राहणाऱ्या घनश्याम परमार (४०) यांनी शनिवारी सकाळी आत्महत्या केली. पत्नीसोबत झालेल्या भांडणामुळे नैराश्येच्या भावनेतून त्यांनी घरातील पंख्याला साडीच्या साहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. तुळींज पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

## लग्नाचे आमिष देऊन अत्याचार

**मीरारोड :** मीरारोड भागात राहणाऱ्या ३२ वर्षीय तरुणीवर ती काम करत असलेल्या ठिकाणी वरिष्ठ स्तरावर काम करणाऱ्या व्यक्तीने त्याच्या पदाचा गैरवापर करत, तसेच तिला लग्नाचे आमिष दाखवून एप्रिल २०२३ ते फेब्रुवारी २०२४ या काळात इच्छेविरुद्ध अत्याचार केला. पीडितेच्या फिर्यादीनुसार काशीगाव पोलिस ठाण्यात आरोपीवर १९ एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात झाला आहे. महिला पोलिस उपनिरीक्षक श्रीलक्ष्मी बोरकर या तपास करत आहेत.

CamScanner

# पुलिस ने जब्त किया गोमांस से लदा टेम्पो

**यशोभूमि / प्रतिनिधि**

**मीरा रोड ।** मीरा-भाईंदर शहर, काशीगांव के डाचकुल पाड़ा परिसर में गोवंश के मांस से लदे टेम्पो के मिलने से इलाके में सनसनी फैल गई है। ज्ञात हो कि अभी कुछ दिन पहले भी काशी गांव में ही गोवंश की निर्मम हत्या का मामला प्रकाश में आया था। मिली जानकारी के अनुसार 21 अप्रैल की रात डाचकुल पाड़ा में एक टेम्पो को शक के आधार पर स्थानीय बजरंग दल के कार्यकर्ताओं ने रोका और कुछ पूछने के पहले ही फौरन गाड़ी रोककर ड्राइवर व उसका साथी फरार हो गये, तब उन लोगों ने उक्त टेम्पो के अंदर रखे गोमांस को देखा तो सन्न रह गये और तुरंत ही पुलिस को सुचना दी। मीरा-भाईदर वसई-विरार पुलिस आयुक्तालय अंतर्गत काशीगांव पुलिस ने टेम्पो और गोमांस को जब्त कर लिया, जिसका वजन 1500 किलो था। पुलिस ने अज्ञात लोगों के खिलाफ महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम 5(सी),9(अ,ब 11), एवं भा दं. वि. की धारा 429,34 के तहत मामला दर्ज कर फरार आरोपियों को सरगर्मी से तलाश कर रही है।

## ड्राइवर व उसका साथी फरार



CamScanner